पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

---

## जाहिरात क्र.६७०/२०२४ चे अनुषंगाने जाहिर निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील अग्निशमन विभागातील अग्निशमन विमोचक/ फायरमन रेस्क्यूअर या गट ड संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता जाहिरात क्रमांक ६७०/२०२४ अन्वये अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते.

अग्निशमन विमोचक/ फायरमन रेस्क्यूअर या पदाच्या सविस्तर जाहिरातीमध्ये महिला उमेदवारांची उंची १६२ सेंटीमीटर तसेच वजन ५० किलोग्रॅम नमूद करण्यात आलेले आहे.

अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ३०/०४/२०२४ रोजीच्या पत्रांन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात अग्निशमन विमोचक या पदाकरिता महिला उमेदवारांकरिता किमान उंची १५७ सेंटीमीटर आणि किमान वजन ४६ किलोग्रॅम याबाबत सुधारणा करणेकामी कळविलेले आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्रमांक ६७०/२०२४ मधील अग्निशमन विमोचक/फायरमन रेस्क्यूअर या पदाकरिता ऑनलाईन अर्ज करणेकामी महिला उमेदवारांकरीता किमान उंची १५७ सेंटीमीटर आणि किमान वजन ४६ किलोग्रॅम याप्रमाणे बदल करून वरील शासन पत्रांन्वये ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरिता परवानगी देण्यात येत आहे, त्याप्रमाणे उमेदवारांनी नोंद घेऊन विहित मुदतीत अर्ज सादर करावेत.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक.साप्रवि/५/कावि/ १९१ /२०२४
दिनांक ०८/०५/२०२४